# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:20.01.2025** **वार:सोमवार**

1. संविधान निर्मात्यांना अभिमान वाटावा असा भारत घडवण्यासाठी कार्यरत राहा-पंतप्रधानांचं 'मन की बात' मधून आवाहन
2. जागतिक आर्थिक मंचाच्या परिषदेत सहभागी होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वित्झर्लंडमध्ये दाखल
3. विकसित भारताचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी सर्वांना बरोबर घेऊन पुढे जाणं महत्त्वाचं -राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन आणि
4. पहिल्याच खो-खो विश्वकरंडक स्पर्धेत नेपाळच्या संघांवर मात करत भारतीय संघांनी रचला इतिहास, महिला-पुरूष संघांचे दणदणीत विजय

**<u>मन की बात</u>**

भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीमध्ये मोलाचं योगदान देणाऱ्या महान नेत्यांचे विचार प्रेरणादायी असून संविधान निर्मात्यांना अभिमान वाटावा, असा भारत घडवण्यासाठी कार्यरत राहिलं पाहिजे, असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. आकाशवाणीवरील मन की बात या कार्यक्रमातून पंतप्रधानांनी काल नागरिकांशी संवाद साधला. येत्या प्रजासत्ताक दिनाला भारतीय राज्यघटना स्वीकृतीला 75 वर्ष पूर्ण होत आहेत, त्यानिमित्त त्यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर, राज्यघटना समितीचे अध्यक्ष डॉ राजेंद्र प्रसाद, डॉ शामा प्रसाद मुखर्जी यांच्या आवाजातील ध्वनिफिती पंतप्रधानांनी श्रोत्यांना ऐकवल्या. 25 जानेवारी हा भारतीय निवडणूक आयोगाचा स्थापना दिवस आहे. हा दिवस राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जातो, त्या पार्श्वभूमीवर निवडणूक निष्पक्ष होण्यासाठी आयोगाच्या कटिबद्धतेचं पंतप्रधानांनी कौतुक केलं.

प्रयागराज इथला महाकुंभ, समता, एकरूपतेचा संगम असल्याचं सांगून हा विविधतेत एकतेचा उत्सव असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. अयोध्येत श्रीराम मंदिरात रामलल्लाच्या प्रतिष्ठापनेच्या वर्षपूर्तीनिमित्त कार्यक्रम आयोजित केल्याचं त्यांनी सांगितलं. येत्या 23 जानेवारीला नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीदिनी आपण पराक्रम दिवस साजरा करणार असल्याची आठवण त्यांनी श्रोत्यांना करुन दिली. अंतराळ संशोधन क्षेत्रात भारत करत असलेल्या ऐतिहासिक कामगिरीचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला. ते म्हणाले....

**साथियो, कुछ दिन पहले हमारे वैज्ञानिकों ने Space Sector में ही एक और बड़ी उपलब्धि हासिल की | हमारे Scientists ने Satellites की Space Docking कराई है | जब अंतरिक्ष में दो spacecraft connect किए जाते हैं, तो, इस प्रक्रिया को Space Docking कहते हैं | यह तकनीक अंतरिक्ष मेंSpace Station तक Supply भेजने और Crew Mission के लिए अहम है | भारत ऐसा चौथा देश बना है, जिसने ये सफलता हासिल की है |**

**साथियो, हमारे वैज्ञानिक अंतरिक्ष में पौधे उगाने और उन्हें जीवित रखने के प्रयास भी कर रहे हैं | इसके लिए ISRO के वैज्ञानिकों ने लोबिया के बीज को चुना | 30 दिसंबर को भेजे गए ये बीज अंतरिक्ष में ही अंकुरित हुए | ये एक बेहद प्रेरणादायक प्रयोग है जो भविष्य में Space में सब्जियां उगाने का रास्ता खोलेगा | ये दिखाता है कि हमारे वैज्ञानिक कितनी दूर की सोच के साथ काम कर रहे हैं |**

**मुख्यमंत्री-दावोस**

दावोसमध्ये होत असलेल्या जागतिक आर्थिक मंचाच्या परिषदेत सहभागी होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काल स्वित्झर्लंडमध्ये दाखल झाले. बृहन महाराष्ट्र मंडळाच्या वतीनं तसंच विविध संस्थांच्या वतीने त्यांचं उत्साहात स्वागत करण्यात आलं. स्थानिक मराठी मंडळींनी पारंपरिक पद्धतीने लेझीम खेळत, मराठी गौरवगीत सादर केलं. मुख्यमंत्र्यांनी उपस्थित मराठी बंधू-भगिनींशी मनमोकळा संवाद साधला.

**राज्यपाल**

समाजातील प्रत्येक घटकाच्या गरजा ओळखून त्यांना एकत्रित घेऊन पुढे गेलो तर भारत निश्चितच एक आदर्श देश म्हणून जगासमोर येईल. असं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी काल पुण्यात केलं. दिव्यांग बांधवांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणत त्यांचं सक्षमीकरण करण्याच्या उद्देशाने, पिंपरी चिंचवड महापालिका दिव्यांग भवनाच्या वतीने आयोजित 'पर्पल जल्लोष' कार्यक्रमाचा समारोप राज्यपालांच्या उपस्थितीत झाला, त्यावेळी ते बोलत होते. हा सोहळा म्हणजे दिव्यांग व्यक्तींच्या प्रबळ इच्छाशक्तीचा केलेला सन्मान आहे, असं सांगत हा सोहळा आयोजित केल्याबद्दल त्यांनी पिंपरी चिंचवड महापालिकेचे अभिनंदन केलं. या कार्यक्रमाला जिल्हा प्रशासन आणि महापालिकेच्या विविध विभागाचे अधिकारी, दिव्यांगांसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

**प्रजासत्ताकदिन**

देशाच्या 76व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त येत्या 26 जानेवारीला ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ राज्यभर एकाच वेळी सकाळी सव्वा नऊ वाजता आयोजित करण्यात येणार आहे. या मुख्य शासकीय समारंभात निमंत्रितांना सहभागी होता यावं यासाठी या दिवशी सकाळी साडे आठ ते दहा या दरम्यान ध्वजारोहणाचा किंवा इतर कोणताही शासकीय किंवा निमशासकीय समारंभ आयोजित करण्यात येऊ नये, असं राजशिष्टाचार विभागामार्फत कळविण्यात आलं आहे. मुंबई इथल्या मुख्य शासकीय समारंभात राज्यपालांच्या हस्ते आणि मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत दादर इथल्या शिवाजी पार्क इथं ध्वजारोहण सोहळा आणि समारंभपूर्वक संचलन कार्यक्रम होईल.

**अजित पवार**

महाराष्ट्राचा विकास हेच आपलं ध्येय असून त्यापासून तसूभरही मागं हटायचं नाही, असं आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं आहे. शिर्डी इथं पक्षाच्या नवसंकल्प शिबिराच्या समारोप सत्रात ते काल बोलत होते. राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष नेत्यांपेक्षा कार्यकर्त्यांचा आहे, हे ठसवण्यासाठी काम करा, असा सल्लाही पवार यांनी कार्यकर्त्यांना दिला.

**मशरूम शेती प्रयोग–पालघर**

वसई जनहित ट्रस्ट आणि कोसबाड हिल कृषि विज्ञान केंद्राच्या मदतीनं पालघर जिल्ह्यातल्या डहाणू तालुक्यामधल्या बांधघर गावात राहणाऱ्या आदिवासी महिलांनी मशरूमच्या शेतीतून चांगला आर्थिक नफा मिळवण्यास

सुरुवात केली आहे. या उपक्रमाबद्दल माहिती देताना कृषि विज्ञान केंद्राच्या शास्त्रज्ञ रुपाली देशमुख आकाशवाणीशी बोलताना म्हणाल्या.....

**अहिल्यादेवी**

भारतीय संस्कृतीच्या प्रतिकांचं संवर्धन करत राष्ट्रीय एकतेच्या पुनर्स्थापनेचं कार्य पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी केलं, असं प्रतिपादन राष्ट्र सेविका समितीच्या प्रमुख संचालिका व्ही. शांताक्का यांनी नुकतंच पुण्यात केलं. एकता मासिक आणि राष्ट्र सेविका समितीच्या वतीने आयोजित अहिल्यादेवी विशेषांकाच्या प्रकाशन समारंभात त्या बोलत होत्या. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, विवेक समुहाचे प्रबंध संपादक दिलीपराव करंबळेकर, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. अहिल्यादेवींनी त्या काळात केलेलं असामान्य कर्तृत्व आजही दीपस्तंभासारखं आहे असं राम शिंदे यावेळी म्हणाले.

**पेटंट-नांदेड**

नांदेड इथल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील संशोधक प्राध्यापक डॉकटर राजाराम माने आणि डॉकटर झोयेक शेख यांच्या पथकानं मानवी मूत्रापासून कार्बन पदार्थाची निर्मिती केली आहे. याच कार्बन पदार्थाचा वापर ऊर्जा निर्मितीसाठी करण्यात येत आहे. त्यांच्या या संशोधनाला अमेरिकन पेटंट प्राप्त झालं आहे. तयार केलेल्या कार्बन नॅनो मटेरियलचा वापर हायड्रोजन निर्मितीसाठी करण्यात आला असून ज्याचा मोठ्या प्रमाणावर उपयोग इलेक्ट्रिक वाहनांसाठी होऊ शकतो. हायड्रोजन आधारित ऊर्जा प्रणालीचा वापर पर्यावरणाला अनुकूल असून, त्याचा मोठा फायदा ऊर्जा क्षेत्रात होऊ शकतो. या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर मनोहर चासकर आणि प्राध्यापक कुंभारखाणे यांनी डॉक्टर माने आणि त्यांच्या सहकाऱ्यांचं अभिनंदन केलं आहे.

**खोखो**

खोखोच्या पहिल्याच विश्वकरंडक स्पर्धेत भारतीय महिला आणि पुरूष संघानं नेपाळच्या दोन्ही संघांना नमवून करंडकावर नाव कोरत इतिहास रचला आहे. या स्पर्धेत काल झालेल्या अंतिम सामन्यात भारतीय पुरूष संघानं नेपाळच्या संघावर 54-36 असा दमदार विजय मिळवला. तत्पुर्वी झालेल्या महिलांच्या सामन्यात महिला संघानं नेपाळवर 78-40 असा दणदणीत विजय मिळवला. नवी दिल्लीच्या इंदिरा गांधी इनडोर स्टेडियमवर काल झालेल्या सामन्याला केंद्रीय क्रीडा मंत्री किरेन रिजीजूसह अनेक मान्यवर उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोन्ही संघांचं अभिनंदन केलं आहे. तर राज्याचे क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांनीही दोन्ही संघाचं अभिनंदन केलं आहे.

**हवामान**

राज्याच्या काही भागात विरळ धुकं आहे. कोकणसह मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भात हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.